अर्ज क्रमांक 544/21
अर्जदाराचे नाव Ad. T.S. Bhase
नक्कलेचा अर्ज आला तो दि. 06/04/21
नक्कल तयार दिनांक 16/04/21
नक्कल दिली तो दि. 16/04/21
रक्कम रुपये 48/- दि. ...... रोजी मिळाले

Regisration No. MAH/ 103/2021
Date 5/4/2021 Under

Assistant Registrar of Societies

परिशिष्ट ब

कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला

अधीक्षक 16/4/21
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग,अकोला

या संस्थेचे ज्ञापन

मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन

१) संस्थेचे नांव - कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला

२.संस्थेचा पत्ता :- प्राचार्य/कला महाविद्यालय व्ही.एच.बी.कॉलनी, एम.आय.डी.सी. फेज.२, रेल्वे क्रॉसिंग जवळ, मलकापूर,अकोला,ता.जि.अकोला

३) संस्थेचे उद्देश :-

१.शैक्षणिक,संशोधन, सामाजिक, प्रशासकीय, व्यवस्थापनीय असे विविध क्षेत्रात कार्यरत असलेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी यांना आमंत्रित करुन त्यांचे मार्गदर्शन घेणे.

२.कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विदयार्थी यांना एकत्रित करणे.त्यांचे संगठन करणे.

३. कला महाविद्यालयातील माजी विदयार्थी यांच्या मधील क्रिडा,गायन,पेंटिग,वादन,सांस्कृतिक इ.कलागुणात निपुन असलेल्या विदयार्थ्यांना बोलवुन सध्या शिकत असलेले विद्यार्थी यांना मार्गदर्शन मिळण्याच्या दुष्टिकोनातुन आंमत्रित करणे.

४. कला महाविद्यालयातील माजी विद्यार्थी यांच्या कडुन मिळालेल्या आर्थिक मदतीचा संस्थेच्या हितार्थ खर्च करणे.

५.कला महाविद्यालयातील माजी विद्यार्थी जे वेगवेगळया क्षेत्रात कार्यरत आहेत.त्यांना सध्या शिकत असलेल्या कॉलेजमधील विद्यार्थी यांना फायदा व्हावा म्हणुन मार्गदर्शन शिबीर,तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

६.विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता नविन उपाय योजना करणे.

७. कॉलेज मध्ये विद्यार्थ्याच्या विविध सुविधाबाबत पाहणी करणे.

८.विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक विकासा करिता मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन करणे.

९.विद्यार्थ्यांच्या आरोग्या संबधी आरोग्य शिबीरांचे आयोजन करणे.

१०. विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परिक्षा संबधी मार्गदर्शन करणे.

११. विविध खेळा संबधी मार्गदर्शन करणे.

धर्मादाय उपआयुक्त
DEPUTY CHARITY COMMISSIONER
AKOLA REGION, AKOLA
सत्यमेव जयते
विभाग, अकोला

Ganode. Bayall. Chawla

१२.आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय विषयावर चर्चासत्रे आयोजित करणे.

१३.मानवी मूल्यांच्या जोपासनेचे कार्य करणे.

१४. एम.पी.एस.सी.,यु.पी.एस.सी., आय.आय.टी., ए.आय.टी., पी.एम.टी., पोलिस पूर्व भरती प्रशिक्षण कॉलेज विद्यार्थी प्रशिक्षण योजना राबविणे.

१५. यशदा, टाटा इन्स्टिटयूट, जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ,इत्यादी संघटनांच्या समाज उपयोगी योजना राबविणे.

१६. उच्च शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना योग्य ती मदत पुरविणे.

१७.गरीब व होतकरु विद्यार्थ्यांकरिता शिक्षणवर्ग चालविणे.

१८.युवा कल्याणाचे विविध प्रकल्प आयोजित करणे,समाजसेवा शिबीर आयोजित करणे.स्वंयरोजगार शिबीराचे आयोजन करणे,बेरोजगार युवक युवतीसाठी कार्यशाळा स्थापन करणे व चालविणे व जिल्हा आणि तालुका पातळीवर युवा महोत्सवं आयोजित करणे.

१९.रक्तदान व नेत्रदान करण्यास प्रोत्साहीत करणे. किडणी, कॅन्सर व हदय रुग्णांना मदत करणे.

२०. ग्रामीण तसेच शहरी भागात आरोग्य सेवा उपलब्ध करणे त्यासाठी दवाखाने, रुग्णालये, व सुश्रूषागृहे स्थापन करणे व चालविणे, रोग चिकित्सा शिबीरे, नेत्र व दंत चिकित्सा शिबीरे, कुटूंब कल्याण शिबीरे, आरोग्य शिक्षण शिबीरे, रक्तदान शिबीरे, आयोजित करणे, आजार व आरोग्य विषयक दवाखाने चालविणे, रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देणे, लोकांना रक्तदान व नेत्रदान करण्यास प्रोत्साहित करणे, व रक्तपेढी व्दारे गरजूंना मोफत रक्तपुरवठा करुन देणे.

Ganode. Bagal Shavla.

**कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला**

नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेच्या व्यवस्थेचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे, पत्ते, हुद्दा, वय, राष्ट्रीयत्व, शिक्षण व व्यवसाय पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. नाव | हुदा | वय | राष्ट्रीयत्व | शिक्षण | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| १.श्री.महेन्द्र भगवान गणोदे | अध्यक्ष | ३२ | भारतीय | बी.ए. | शेती |
| मु.पो.अमाना ता.मालेगाव, जि.वाशिम | | | | | |
| २.कु.भागश्री सनातन तायडे | उपाध्यक्ष | २७ | भारतीय | बी.ए. | गृहीणी |
| मु.पो.येवता, ता.जि.अकोला | | | | | |
| ३.कु.शिखा गोविंदराव चावला | सचिव | २३ | भारतीय | बी.एफ.डी. | शिक्षण |
| मु.पो.साईकृपा अपार्टमेंट,हिराबाई प्लॉट,आदर्श कॉलनी,अकोला | | | | | |
| ४.श्री.पंकज किशोर इंगळे | सहसचिव | ३० | भारतीय | बी.ए. | नोकरी |
| मु.पो.पळसो बढे, ता.जि.अकोला | | | | | |
| ५.सौ.शैला गजेन्द्र पुनकर | कोषाध्यक्ष | ४३ | भारतीय | बी.ए. | गृहीणी |
| मु.पो.कला महाविद्यालय जवळ, व्ही.एच.बी.कॉलनी, मलकापूर, अकोला | | | | | |
| ६.श्री.ऋषिकेश ज्ञानेश्वर वैराळे | सदस्य | २३ | भारतीय | बी.ए. | शिक्षण |
| मु.बोरगाव वैराळे, पो.हातरूण,ता.बाळापूर, जि.अकोला | | | | | |
| ७.कु.श्वेता नागोराव वसू | सदस्य | २३ | भारतीय | बी.एफ.डी. | शिक्षण |
| मु.पो.मेहरे नगर, डाबकी रोड, अकोला | | | | | |

आम्ही खालील सहया करणार **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की,संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्राय केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्रित येऊन **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** संस्थेची आज दि.१२/ ०३/२०२१ रोजी स्थापना केली**,** असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी या विधानावर सह्या केलेल्या आहेत.

| अ.क्र. नांव व पत्ता | सह्या |
|---|---|
| १.श्री.महेन्द्र भगवान गणोदे<br>मु.पो.अमाना ता.मालेगाव, जि.वाशिम | Ganode |
| २.कु.भागश्री सनातन तायडे<br>मु.पो.येवता, ता.जि.अकोला | Bayalle |
| ३.कु.शिखा गोविंदराव चावला<br>मु.पो.साईकृपा अपार्टमेंट,हिराबाई प्लॉट,आदर्श कॉलनी,अकोला | Chawla |
| ४.श्री.पंकज किशोर इंगळे<br>मु.पो.पळसो बढे, ता.जि.अकोला | [signature] |
| ५.सौ.शैला गजेन्द्र पुनकर<br>मु.पो.कला महाविद्यालय जवळ, व्ही.एच.बी.कॉलनी, मलकापूर, अकोला | Spunkar |
| ६.श्री.ऋषिकेश ज्ञानेश्वर वैराळे<br>मु.बोरगाव वैराळे, पो.हातरूण,ता.बाळापूर, जि.अकोला | R.Vairale |
| ७.कु.श्वेता नागोराव वसू<br>मु.पो.मेहरे नगर, डाबकी रोड, अकोला | S.N.Vasu. |

दिनांक१२/०३/२०२१

वरील सहया करणार सर्व इसमांना मी ओळखतो.

T. S. KHORE
ADVOCATE ... LL.B
AKOLA

Made by-
Read by-
Treat by-

सत्यप्रत म्हणून प्रमाणित
१६/४/२१
प्रशासकीय अधिकारी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग, अकोला

अर्ज क्रमांक 544/21
अर्जदाराचे नाव Ad. T. S. Bhore
नक्कलेचा अर्ज आला तो दि. 16/04/21
नक्कल तयार दिनांक 16/04/21
नक्कल दिली तो दि. 16/04/21
रक्कम रुपये 48/- दि. -- रोजी मिळाले

Registration No. MAH/ 103/2021
Date 5/4 /2021 Under

Assistant Registrar of Societies

परिशिष्ट क

कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला

अधिक्षक 16/4/21
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग, अकोला

नियम व नियमावली :-

कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला

१) नियमावली संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

संस्था म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** असे समजले जाईल.

अध्यक्ष म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल

उपाध्यक्ष म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल

सचिव म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** या संस्थेचे सचिव असे समजले जाईल

सहसचिव म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** या संस्थेचे सहसचिव असे समजले जाईल

कोषाध्यक्ष म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** या संस्थेचे कोषाध्यक्ष असे समजले जाईल

**कार्यकारी मंडळाचा सभासद** म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** संस्थेचे कार्यकारी मंडळातील सभासद असे समजले जाईल

सभासद म्हणजे **कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** या संस्थेचे सभासद समजले जाईल.या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा सभासद त्याला सभासद असे समजले जाईल.

Pande. Bayadl Shaula

**ब. आजीवन सभासद (लाईफ मेंबर):-** रुपये ५,००/- वर्गणी रक्कम देणा-या व्यक्तीस आजीवन सभासद होता येईल व त्याचे सभासदत्व आजीवन राहील.

क. **साधारण सभासद :-** रुपये ५०/- इतकी वार्षिक सदस्य फी देणाऱ्या व्यक्तीस साधारण सभासद होता येइल.

**७) सभासदत्व रद्द करण्याबाबत :-** कोणताही सभासद कोर्टाद्वारे गुन्हेगार ठरला असेल,नैतिक अधःपतन झाले असेल,देश विघातक कार्यात गुंतला असेल, ६ महिन्यापेक्षा जास्त परदेशात गेला असेल,व्यसनी झाला असेल,मरण पावला असेल, नोटीस देऊन सुध्दा कोणतेही लिखीत कारण न देता तीन वेळेस सभेला गैरहजर राहणाऱ्या सदस्यांचे कार्यकारी मंडळाचे बहुमताने ठराव पास करुन सभासदत्व रद्द करता येईल.

**८) सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार आणि कार्ये :**

अ) सर्व साधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय घेणारी समजली जाईल.

ब) या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील.मात्र उपस्थित सभासदांकडे कोणत्याही प्रकारची रक्कम येणे बाकी नसावी.

क) कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.

ड) वार्षिक हिशोब मंजूर करणे, पुढील वर्षाचे अंदाजपत्रके मंजूर करणे.

इ) वेळेवर अध्यक्षाचे परवानगीने येणारे विविध ठरावांना मंजूर करणे अथवा नामंजूरी देणे.

ई) कार्यकारी मंडळाची निवड करणे.

Ganode Bayaab Shaula

९) **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :**

सर्वसाधारण सभेची सुचना अध्यक्षांच्या सहीने नोटीस बुकद्वारे अथवा प्रसंगी पोस्टाने ०८ (आठ) दिवस अगोदर देण्यात येईल.सर्वसाधारण सभा घेतांना २/३ (दोंन तृतीयांश) गणसंख्या हजर नसेल तर सभा तहकुब करण्यात येईल. त्यांनतर त्याच दिवशी,त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकुब झालेली सभा घेण्यात येईल.त्या सभेला मग कोरमचे बंधन राहणार नाही.तसे नोटीसद्वारे नमुद करावे.

१०) **विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्ये :**

विशेष सर्वसाधारण सभा १० (दहा) दिवसांची नोटीस,अध्यक्षांच्या सहीने नोटीस बुकाद्वारे अथवा प्रसंगी पोस्टाने देऊन अध्यक्षांना बोलविता येईल. या सभेमध्ये संस्थेच्या नावांमध्ये बदल , विलीनीकरण,उद्देशात वाढ वा कमी करणे व संस्थेचे समाप्तीकरण तसेच संस्थेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने निर्णय घेण्यात येतील.

११) **संस्थेचे कार्यकारी मंडळ व त्यातील पदाधिकारी यांची रचना :**

संस्थेचे कार्यकारी मंडळ कमाल व किमान एकुण **सात** सदस्यांचे राहील.

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष - एक** | **उपाध्यक्ष - एक** | **सचिव - एक** |
| **सहसचिव - एक** | **कोषाध्यक्ष - एक** | **सदस्य - दोन** |

१२) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच (०५) वर्षाचा राहील , निवडणूक दर पाच (०५) वर्षानी घेण्यात येईल.कार्यकारी मंडळाची निवडणूक सर्वसाधारण सभेत सर्व संमती किंवा गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल.

Garode    Bagade    Shamla

**१३) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये :**

**अ) अध्यक्ष :** सभेचे कामकाज चालविणे,संस्थेच्या हित संबंधाने योग्य ते निर्णय घेणे.संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखावर नियंत्रण ठेवणे,सर्वसाधारण सभा आयोजित करणे व सभेची नोटीस सचिवाला सांगून अध्यक्षांचे सहीने काढणे,सभेचे अध्यक्षपद स्विकारणे व त्यादृष्टीने आवश्यक ती कोर्ट कचेरीचे कामे करणे.

**ब)उपाध्यक्ष :** अध्यक्षांचे अनुपस्थितीत अध्यक्षांचे काम पाहणे,तथा इतर वेळी संस्थेच्या विकास कार्यात मदत करणे

**क) सचिव :**संस्थेचा पत्रव्यवहार सांभाळणे,सेवकांवरलक्ष ठेवणे,मंजूर झालेला ठराव अंमलात आणणे, संस्थेच्या दृष्टीने हितावह असलेले कोणतेही काम करणे.तक्रारीचे निवारण करणे,संस्थेच्या कार्यावर लक्ष ठेवणे.

**ड) सहसचिव :** सचिव यांच्या अनुपस्थितीत सचिवांचे काम पाहणे, तथा इतर वेळी संस्थेच्या विकास कार्यात मदत करणे

**इ)कोषाध्यक्ष :** संस्थेच्या आर्थिक परिस्थीती वर नियंत्रण ठेवणे, हिशोब पुर्ण झाल्यावर अध्यक्षा यांचे समोर ठेवणे व मान्यता घेणे, हिशोबाचे पुस्तकावरुन वार्षिक पत्रके तयार करणे, रक्कमांची देवाणघेवाण करणे, हिशोब लिहीणे किंवा लिहून घेणे,ऑडीटर यांनी हिशोबातून काढलेल्या त्रुटीची पूर्तता करणे.

**ए) कार्यकारी सभासद :**

कार्यकारी मंडळाच्या सभेत व साधारण सभेत उपस्थित राहणे,निवडणूकीचे वेळी मतदान करणे व संस्थेचे दैंनदिन कामात आवश्यक ती मदत करणे.

**१४) कार्यकारी मंडळाची सभा :**

कार्यकारी मंडळाची सभा वर्षातून दोनदा घेतली पाहिजे.सभेची नोटीस अध्यक्षाचे सहिने ०७(सात) दिवस अगोदर नोटीस बुकद्वारे अथवा पोष्टाने सदस्यांना दिली पाहीजे.२/३ (दोन तृतीयांश) मागणीच्या विषयावर चर्चा करण्यात येईल व संस्थेच्या हितामध्ये निर्णय घेण्यात येतील.

**१५) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना अध्यक्षांच्या सहीने कमीतकमी ०७ (सात) दिवस अगोदर नोटीस बुकद्वारे अथवा पोष्टाने सदस्यांना मिळाली पाहीजे.अशारितीने पाठविले पाहिजे सभेच्यादिवशी २/३ (दोन तृतीयांश) सभासद उपस्थित असणे आवश्यक आहे.गणसंख्या पुर्ण न झाल्यास सभा तहकुब करण्यात येईल,त्यानंतर त्याच ठिकाणी,त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर झालेली सभा होईल त्या सभेला मग गणपूर्तीचे बंधन राहणार नाही.तसे सभेच्या नोटीसद्वारे नमुद करावे.

**१६) कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :**

संस्थेची कोणत्याही प्रकारची येणे बाकी असल्यास निवडणूक लढविण्यासाठी तो सदस्य अपात्र ठरेल.फक्त नियमित सर्व सभासदांनाच निवडणुकीस उभे राहता येईल. एक वर्षभर मंडळ/संस्थेचा सोसायटीचा सभासद राहील्यानंतर व नियमित सभासद फी भरलेल्यास मतदानाचा अधिकार सदस्यास राहील निवडणूक आमसभेत बहूमताने होईल.निवडणूकीची सुचना १५ दिवस अगोदर देण्यांत येईल.

**१७) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :** कार्यकारी मंडळाच्या सभासदाच्या मृत्युमुळे किंवा राजिनाम्यामुळे किंवा अन्य कारणाने रिक्त होणारी जागा कार्यकारी मंडळाच्या हयात असलेल्या किंवा उरलेल्या सभासदांच्या बहुमताने भरण्यात येईल.

१८) **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :**

संस्थेच्या सेवकांची नेमणूक करणे,कामावरुन कमी करणे,त्यांच्या वर नियंत्रण ठेवणे की,ज्यामुळे संस्थेचे काम व्यवस्थितपणे चालेल.संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या शाखांवर नियंत्रण ठेवणे,संस्थेची सर्व प्रकारची कामे पाहणे,सर्व साधारण सभेच्या ठरावांची पुर्तता करणे,संस्था चालविण्यासाठी आवश्यक तें किरकोळ नियम तयार करणे,संस्थेच्या उद्देशानुसार संस्थेचे कार्य चालविणे,संस्थेच्या वार्षिक कार्यकारी मंडळाची यादी तयार करुन विभागीय असिस्टंट रजिस्टार ऑफ सोसायटीज् यांच्या कार्यालयात ठरावांच्या नकलेसह दाखल करणे,संस्थेच्या मंडळात किंवा मालमत्तेत बदल झाल्यास बदल अर्ज विभागीय कार्यालयात पाठविणे,सभासदांची यादी ठेवणे व त्याबाबत परिशिष्ट ६ विहीत नमुन्यात असिस्टंट रजिस्टार ऑफ सोसायटीज यांचे कार्यालयात दरवर्षी जानेवारीत पाठविणे,जमा खर्चाचे हिशोब व्यवस्थित ठेवून त्याचे ऑडीट करुन घेवून सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे,उपसमित्या नेमणे किंवा एखाद्या सदस्यास विशेषाधिकार प्रदान करणे,संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने कामे करणे किंवा योजना बनविणे व त्या संस्थेच्या उन्नतीकरिता राबविणे.

१९) **संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग:**

सभासदांकडून मिळालेली देणगी/फी/नगदी किंवा अन्य कोणत्याही स्वरुपात मिळालेली देणगी व समर्पण निधी ही संस्थेची मिळकत राहील व त्याचा विनीयोग संस्थेच्या उद्दीष्ठांवर करण्यात येईल.

२०) **उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद :**

संस्थेच्या उत्पन्नातून १०० टक्के रक्कम उदेशानुसार खर्च करण्यात येईल.

Pande Bayade Awale

**२१) कर्जे किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :**

संस्था आपल्या सभासदांकडून ठेवी व कर्जे घेऊ शकेल.परंतु त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देणार नाही व ती सर्व रक्कम बिनव्याजी राहील.संस्थेला कर्ज घ्यावयाचे असेल तेव्हा मा.धर्मादय सह.आयुक्त,अमरावती लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**२२) स्थावर मालमत्ता खरेदी-विक्री याबाबतची तरतूद :**

संस्थेच्या उद्देश पूर्तीकरिता संस्थेला कोणत्याही प्रकारची मालमत्ता खरेदी करता येईल.स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास सर्व कार्यकारी मंडळातील सदस्यांचे मंजुरीने ठराव पास केल्याशिवाय व मा.धर्मादाय सह.आयुक्त,अमरावती लेखी पूर्व परवानगीशिवाय खरेदी विक्री करु नये.

**२३) बँक खाते :** संस्था कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यताप्राप्त शेडयुल बँकेत खाते उघडु शकेल अध्यक्ष व कोषाध्यक्ष अश्या दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने बँकेतून रक्कम काढता येईल.

**२४) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :**

अ) संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ चे नियम १५ व अनुसूचि ६ या विहीत नमुन्यात संस्थेच्या सदस्यांची यादी ठेवण्यात येईल.

ब) संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम ४ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ चे कलम ७ व अनुसूचि १ या विहीत नमुन्यात संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी मा.सहाय्यक संस्था निबंधक,अकोला यांचे कार्यालयात दरवर्षी पाठविण्यात येईल.

क) संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम ४-अ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १०७१ चे नियम ८ व अनुसूचि २ या विहीत नमुन्यात संस्थेच्या कर्मचाऱ्यांची यादी मा.सहाय्यक संस्था निबंधक,अकोला यांचे कार्यालयात दरवर्षी पाठविण्यात येईल.

२५) **नियम व नियमावलीची बदल करण्याची तरतूद :**

नियमावलीतील बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत १०० टक्के सभादांच्या संमतीने तसा ठराव घेऊन ३/५ (तीन पंचमांश) बहुमताने मंजूर झाल्यास ते नवीन नियम करुन घेता येईल.

२६) **संस्थेच्या नावात बदल,उद्देशात बदल अगर विलीनिकरणाबाबत तरतूद :**

संस्थेच्या नांवात बदल,उद्देशात बदल अथवा दोन संस्थांचे विलीनिकरण करावयाचे असल्यास १८६० चे नोंदणी अधिनियमातील कलम १२ व १२-अ प्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

२७) **संस्थेचे समाप्तीकरण अथवा विर्सजन :**

संस्थेचे कामकाज बंद करावयाचे असल्यास रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विर्सजनाची कार्यवाही करणे.

**- दाखला -**

प्रमाणित करण्यात येते की,**कला महाविद्यालय मलकापूर अकोला माजी विद्यार्थी संघ, अकोला ता.जि.अकोला** ही या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| | | |
|---|---|---|
| १.श्री.महेन्द्र भगवान गणोदे | अध्यक्ष | ....Ganode.... |
| २.कु.भागश्री सनातन तायडे | उपाध्यक्ष | ....Bayade.... |
| ३.कु.शिखा गोविंदराव चावला | सचिव | ....Chawla.... |

स्थळ :- अकोला

दिनांक १२/०३/२०२१

धर्मादाय उपआयुक्त DEPUTY CHARITY COMMISSIONER AKOLA REGION, AKOLA अकोला विभाग, अकोला

खरी नक्कल म्हणून प्रमाणित

अधीक्षक १८/५/२१

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग,अकोला

Made by-
Read by-
Treat by-

Ganode. Bayade Chawla